सिडको
शहरांचे शिल्पकार

**शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित**
कार्मिक विभाग
सिडको भवन, २ रा मजला, सीबीडी, बेलापूर, नवी मुंबई-४००६१४
दुरध्वनी क्रमांक: ०२२-६७९१८२५१ ईमेल: mp@cidcoindia.com

सिडको/कार्मिक/भरती/गो.अ./२०२३/E-215825 दिनांक 05/06/२०२३

# परिपत्रक

**संदर्भ : १) दिनांक २९/०३/२०२३ रोजीचे परिपत्रक क्र. सिडको/कार्मिक/भरती/गो.अ./२०२३/E-१९७१४७**
**२) दिनांक १३/०४/२०२३ रोजीचे परिपत्रक क्र. सिडको/कार्मिक/भरती/गो.अ./२०२३/E-२०१०८९**
**३) दिनांक २९/०३/२०२३ रोजीचे परिपत्रक क्र. सिडको/कार्मिक/भरती/गो.अ./२०२३/E-१९७४५६**

सन २०२२-२३ करीताचे वार्षिक गोपनीय अहवाल भरणेबाबत महामंडळातील अधिकारी/कर्मचारी यांना संदर्भीय परिपत्रक क्र. १ अन्वये आवाहन करण्यात आले होते. बहुतांश अधिकारी/कर्मचारी यांनी गोपनीय अहवाल विहीत मुदतीत न भरल्याने संदर्भिय परिपत्रक क्र. २ अन्वये मुदतवाढ देण्यात आली होती. तथापि, संदर्भीय पत्र क्र. ३ अन्वये गोपनीय अहवालातील प्रतिवेदन / पुनर्विलोकन अधिकारी यांनी त्यांचे अधिनस्त अधिकारी/कर्मचाऱ्यांचे गोपनीय अहवालाची कार्यवाही पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र विभाग प्रमुखांनी दि. ३१ मे, २०२३ पर्यंत सादर करणेबाबत आवाहन केले आहे. आजतागायत बहुतांश विभाग प्रमुखांनी सदर प्रमाणपत्र सादर न केल्याचे आढळून आले आहे.

त्याअनुषंगाने महामंडळातील सर्व विभाग प्रमुखांना सूचित करण्यात येते की, **सन २०२२-२३** या वर्षातील गोपनीय अहवालाबाबतची कार्यवाही पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र दि. ०८/०६/२०२३ पर्यंत कार्मिक विभागास सादर करावे. अन्यथा संदर्भीय परिपत्रक क्र. १ नुसार प्रतिवेदन व पुनर्विलोकन अधिकाऱ्यांची वार्षिक वेतनवाढ रोखण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

05/06/23
(फैयाज खान)
व्यवस्थापक (कार्मिक)

प्रति,

सर्व विभाग प्रमुख : सदर परिपत्रक विभागातील प्रतिवेदन/पुनर्विलोकन अधिकारी यांच्या निदर्शनास आणून द्यावे.

माहितीस्तव प्रत :
१. मा. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक
२. मा. सहव्यवस्थापकीय संचालक-१
३. मा. सहव्यवस्थापकीय संचालक-२
४. मा. सहव्यवस्थापकीय संचालक-३
५. मा. मुख्य प्रशासक (नवीन शहरे)
६. मा. मुख्य दक्षता अधिकारी
७. व्यवस्थापक (प्रणाली) : इंट्रानेट वर प्रसिध्दीसाठी

Amrita

SYSTEM DEPARTMENT
CIDCO/SD/SM
Inward No. 904
SAP No. E-215825
Date 07-06-2023